स्थायी समितीच्या **मंगळवार दिनांक 09–10–2018** रोजी **दुपारी 03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

1. मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा — सभापती
2. मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे — सदस्य
3. मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार — सदस्य
4. मा. श्री.महेश केशवराव महाजन — सदस्य
5. मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे — सदस्य
6. मा. सौ. सोनाली शालीक कडु — सदस्या
7. मा. सौ. मंगला शशांक खेकरे — सदस्या
8. मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे — सदस्या
9. मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे — सदस्या
10. मा. श्री. नागेश महादेव मानकर — सदस्य
11. मा. सौ. कल्पना राम कुंभलकर — सदस्या
12. मा. सौ. अर्चना विवेक पाठक — सदस्या
13. मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे — सदस्या
14. मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे — सदस्या
15. मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद — सदस्य
16. मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार — सदस्या

## उपस्थित अधिकारी

1. श्री रविन्द्र ठाकरे, आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 270:–**
**{स्लम विभाग}**

प्रभाग क्र. 22 बौध्द मोहल्ला परिसर सी.ए. रोड च्या मागे सिमेंट कॉक्रीट रोड बनविण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 05 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. जी.बी. कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 11.86% टक्के कमीवर असलेली रूपये 48,41,231/– (रूपये अठ्ठेचाळीस लक्ष, एक्केचाळ हजार दोनशे एकतीस फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 271:–**
**{लोककर्म झोन 4}**

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत पश्चिम नागपूर विधान सभा क्षेत्रातील प्रभाग क्र. १२ एअरफोर्स सोसायटी, आकाशदिप सोसायटी, गर्व्हमेंट प्रेस सोसायटी, वैभव माता ले-आऊट, गुरूदत्त

सोसायटी, ओमशांती ले–आऊट व साईबाबा सोसायटी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव एकुण 06 अर्हता प्राप्त निविदांकारांपैकी में. डि.सी. गुरूबक्षाणी हयांची 13.00% कमी दराची रक्कम 69,45,482/- (रूपये ऐकोणसत्तर लक्ष पंचेचाळीस हजार चारशे ब्यांशी रूपये फक्त) रक्कमेची निम्नतम निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 272:– {लोककर्म झोन 4} महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत पश्चिम नागपूर विधान सभा क्षेत्रातील धरमपेठ व्ही.आय.पी. रोड येथे सृष्टी संकुलाच्या बाजुच्या नाल्याचे भिंत करण्याच्या कामास्तव एकुण 04 अर्हता प्राप्त निविदांकारांपैकी मे. जानवी इंटरप्राईजेस हयांची 11.80% कमी दराची रक्कम 31,49,886/- (रूपये ऐकत्तीस लक्ष ऐकाणपन्नस हजार आठ शे छहयांशी रूपये फक्त) रक्कमेची निम्नतम निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 273:– {लोककर्म झोन 4} महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत पश्चिम नागपूर विधान सभा क्षेत्रातील प्रभाग क्र. १२ गौरखेडे कॉम्प्लेक्स जवळ हिंगोलबिका सोसायटी व मोटघरे ले–आऊट मधील ओमकार अपार्टमेंट, चैतन्य अपार्टमेंट, व गौरव अपार्टमेंट, येथील फुटपाथ तयार करणे व रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव एकुण 05 अर्हता प्राप्त निविदांकारांपैकी मे. प्रेमचंदराचुमल हयांची 8.89% कमी दराची रक्कम 28,46,221 (रूपये अठ्ठविस लक्ष छेचाळीस हजार दोन शे ऐकविस रूपये फक्त) रक्कमेची निम्नतम निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 274:– {लकडगंज झोन 8} लकडगंज झोन क्र. ८ अंतर्गत प्रभाग समिती ठराव क्र. ०४, दिनांक ०४/०८/२०१८ अन्वये प्रभाग निहाय व पद निहाय सन २०१८ – २०१९ चे प्रभाग समितीचे अंदाज पत्रकास – परिशिष्ठ 'अ' व 'ब', प्रभाग समिती ठराव क्र. ०४, दिनांक ०४/०८/२०१८ द्वारे प्रभाग समितीने मंजुरी प्रदान करून म.न.पा. स्थायी समितीच्या मान्यतेकरीता शिफारस केलेली आहे.

सबब या प्रभाग समितीचा अंदाजपत्रक २०१८–२०१९(परिशिष्ठ 'अ' व 'ब') स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 275:– {लोककर्म झोन 5} प्रभाग क्र. 27 – ब येथिल नेहरूनगर उद्यान व एन.एम.सी. झोन कार्यालय पर्यंत रोडचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचा कामास्तव रूपये 35,01,950/– च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 276:– {झोन क्र. 3} हनुमाननगर झोन क्र. ०३ अंतर्गत प्रभाग समिती ठराव क्र. ०३, दिनांक २७/०७/२०१८ अन्वये प्रभाग निहाय व पद निहाय सन २०१८ –२०१९ चे प्रभाग समितीचे अंदाजपत्रकास परिशिष्ट –'अ' प्रभाग समिती ठराव क्र. ०३, दिनांक २७/०७/२०१८ व्दारे प्रभाग समितीने मंजुरी प्रदान करून म.न.पा. स्थायी समिती च्या मान्यते करीता शिफारस केली आहे.

सबब या प्रभाग समितीचा अंदाजपत्रक २०१८–२०१९ (परिशिष्ट –'अ') स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 277:– {लोककर्म झोन 6} प्रभाग क्र. 18 अंतर्गत फवारा चौक येथे स्पोर्ट्स सेंटरचे आंतरीक कामास्तव प्राप्त मे. गुप्ता कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा २.०७ टक्के कमी दरांची रू.१,०६,१५,०३०/– रकमेची एकमेव निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 278:– {लोककर्म झोन 4} महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत पश्चिम नागपूर विधान सभा क्षेत्रातील प्रभाग क्र. ११ आर.

एम.एस. कॉलोनी येथे जे.के.ईलेक्ट्रीक ते रिंग रोड चौक पर्यंत रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव एकुण 06 अर्हता प्राप्त निविदांकारांपैकी में. प्रेमचंद राचुमल हयांची 8.89% कमी दराची रक्कम 32,52,216/- (रूपये बत्तीस लक्ष बावण हजार दोनशे सोळा रूपये फक्त ) रक्कमेची निम्नतम निविदा मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 279ः—**
**{स्लम विभाग}**

प्रभाग क्र. 22 गंगाबाई घाट रोड, स्वीपर मोहल्ला येथे सिमेंट कॉक्रीट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 03 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. जी.बी. कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 10.30% टक्के कमीवर असलेली रूपये 86,25,423/— (रूपये छयान्शी लक्ष, पंचवीस हजार चारशे तेवीस फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 280ः—**
**{स्लम विभाग}**

प्रभाग क्र. 18 वकिलपेठ येथे शिल्पकार स्पोर्ट ते साखरकर यांचे घरापर्यन्त सिमेंट रोड बनविण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 03 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. जी.बी. कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 2.11% टक्के कमीवर असलेली रूपये 26,06,760/— (रूपये सव्वीस लक्ष, सहा हजार सातशे साठ फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

या कामाचा खर्च लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करण्यात येईल.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 281ः—**
**{आरोग्य विभाग(एम)}**

OPD क्लिनिक (बाहयरुग्ण वैद्यकीय व्यवसायिक) नामांकनासाठी विभागाद्वारे वापरण्यात येणारे पुर्वनिकष कायम ठेवून, मुख्यतः रहिवाशी सदनिकेतील रहिवाशी कुटुंबांना खाजगी क्लिनिक पासून त्रास होऊ नये व वैद्यकीय व्यवसायिकांच्या बाहयरुग्ण व्यवसायाबाबत अधिकारांचे हनन होणार नाही. या बाबी विचारात घेऊन आरोग्य विभागाद्वारे निकष प्रस्तावित करण्यात आले होते. सदर निकषात वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभा दि. १२/१०/२०१७ मधील सुचनेप्रमाणे बदल/सुधारणा सह प्रस्ताव सभागृहाकडे चर्चेकरीता सादर करण्यात आला असता सदर प्रश्न सभागृहाने विचारात घेऊन या धोरणा संदर्भात अनेक सुचना असल्यामुळे सर्वकष धोरण ठरविण्याकरीता हा विषय आरोग्य समितीकडे अग्रेषीत करण्यात यावा असे नागपूर महानगरपालिकेच्या दि. ०८/१२/२०१७ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. १५६ मधील निर्देशाप्रमाणे आरोग्य समितीकडे अग्रेषीत करण्यात आला.

वरील निर्देशाप्रमाणे दि. ०६/०२/२०१८ मधील वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती मा. सभापती यांचे निर्देशाप्रमाणे, दि. १२/१०/२०१७ रोजीच्या सभेत ओपीडी क्लिनिक व्यवसायिक नामांकनासाठी ठरविण्यात आलेले खालीलप्रमाणे शुल्क हे एप्रिल २०१८ पासून लागू करण्यासाठी मनपा सभागृहाची मंजूरी घेऊन कार्यवाही करावी अशी समितीने शिफारस केली होती.

| अ. क्र. | व्यवसायिक संरचना | पुर्व स्थापीत वार्षिक शुल्क | विभागाद्वारे प्रस्तावित वार्षिक शुल्क | वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभा दि. १२.१०.१७ च्या सुचनेप्रमाणे ०१ एप्रिल २०१८ पासून लागू करण्यात येणारे वार्षिक नामांकन शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | जनरल बाहयरुग्ण व्यवसाय (ओपीडी क्लिनिक) | ५००/- रु. | १०००/- रु. | २०००/- रु. |
| २ | मल्टीस्पेशालिटी व्यवसाय | ५००/- रु. | ३०००/- रु. | ४०००/- रु. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बाहयरुग्ण (ओपीडी क्लिनिक) | | | |
| ३ | नेत्र चिकित्सा/दंत चिकित्सा व्यवसाय (ओपीडी क्लिनिक) | ५००/- रु. | २०००/- रु. | ४०००/- रु. |
| ४ | धर्मार्थ दवाखाना बाहयरुग्ण ओपीडी क्लिनिक | ५००/- रु. | १०००/- रु. | १०००/- रु. |
| ५ | पॅथालॉजी लेबोरेटरी | १०००/- रु. | ३०००/- रु. | ४०००/- रु. |
| ६ | रक्तपेढी (ब्लड बॅक) | १०००/- रु. | २०००/- रु. | २०००/- रु. |

उपरोक्त सुधारीत ओपीडी नामांकन शुल्क दि. ०१ एप्रिल २०१८ पासून लागू करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेऊन हा विषय स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा व स्थायी समितीने दरवाढीचे दर व नियम याचा अभ्यास करुन विषय महासभेकडे सादर करावा, असे नागपूर महानगरपालिकेच्या दि. ०२/०७/२०१८ रोजी भरलेल्या स्थगीत सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्तातुन घेतलेला उतारा ठराव क्र. २३९ चे अनुपालनास्तव वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीद्वारे सुचित करण्यात आलेले ओपीडी नामांकन शुल्क लागु करण्याचा प्रश्न महासभेत विचारात घेण्यास विभागाद्वारे तयार करण्यात आलेले विषयाचे प्रारुप सादर आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. सभागृहाकडे विषय अग्रेषित करावा, विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 282:—** प्रभाग क्र. 27 — अ अंतर्गत नंदनवन कॉलनी परिसरात रोडचे रूंदीकरण
**{लोककर्म झोन 5}** व डांबरीकरण करण्याचा कामास्तव रूपये 31,40,220/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 283:—** प्रभाग क्र. १४ येथील करोडपती गली येथे डिस्ट्रिक बार असोसिएशनचे पार्किंग करिता
**{लोककर्म झोन 2}** असलेल्या जागेजवळील नाल्याची भिंत बांधण्याच्या कामाच्या रु. ३८,७३,८५२/— च्या कामास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 284:—** प्रभाग क्र. १४ येथील करोडपती गली येथे डिस्ट्रिक बार असोसिएशनचे पार्किंग करिता
**{लोककर्म झोन 2}** असलेल्या जागेचे समतलीकरण करुन पेव्हीग ब्लॉक लावण्याच्या रु. ५८,६८,१०८/— च्या कामास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 285:—** नागपूर महानगरपालिकेतील वाहने/मशिनरी, देखभाल व दुरुस्ती अंतर्गत
**{कारखाना विभाग}** स्पेअरपार्ट खरेदी व दुरुस्ती तसेच टायर टयुब, बॅटरी, हार्डवेअर मटेरियल खरेदी ही अधिकृत विक्रेता यांच्याकडुण करणे, जी साहित्य उपलब्धता अथवा दुरुस्ती प्रक्रिया अधिकृत विक्रेता यांच्याकडुण होणे शक्य नसेल त्याबाबत नियमित प्रक्रिये अंतर्गत ई—निविदा, दरपत्रकानुसार करण्याचा तसेच कार्यान्वीत दरकरार करण्याची मुदतवाढ दि. 28/09/2018 पर्यंत असल्यामुळे जो पर्यत नविन प्रस्तावित प्रक्रियेची अमंलबजावणी होत नाही तो पर्यंत कार्यान्वित दर सुचीनुसार वाहने/मशिनरी, देखभाल व दुरुस्तीचे कामे करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 286:—** म.न.पा. प्रवर्तन विभागाद्वारे दि. 17.09.2018 रोजी झालेल्या ऑनलाईन
**{प्रवर्तन विभाग}** ई—लिलाव प्रक्रिया सुरु करण्यात आलेली होती. भंगार साहित्याची प्राकलनीय राशी 8,12,000/— ठेवण्यात आलेली होती. ऑनलाईन ई—लिलाव प्रक्रिया ही दुपारी 1.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत सुरु होती. ऑनलाईन ई—लिलाव प्रक्रिया दुपारी 5.20 वाजेपर्यंत पूर्ण करण्यात आली. त्याप्रमाणे ऑनलाईन ई—लिलावामध्ये उच्चतम बोली लावणाऱ्या 3 दात्यांची नावे खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | दात्यांचे नाव | उच्चतम रक्कम | 18% जी.एस.टी. | एकूण रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s R.S. Traders | 27,42,000/- | 4,93,560/- | 32,35,560/- | H-1 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | M/s. Raza Metals | 27,32,000/- | 4,91,760/- | 32,23,760/- | H-2 |
| 3 | M/s. Raza Electricals | 23,12,000/- | 4,16,160/- | 27,28,160/- | H-3 |

उपरोक्त नमूद उच्चतम बोलीधारक मे. आर. एस. ट्रेडर्स यांची रु. 27,42,000/— अधिक जी.एस. टी. रु. 4,93,560/— असे एकुण रु. 32,35,560/— मंजुरीची शिफारस करण्यात येत आहे.

तसेच जर काही कारणास्तव प्रथम उच्चतम बोलीधारकाने बोलीची रक्कम न भरुन भंगार उचल करण्यास नकार दिल्यास त्याची जमा असलेली ई.एम.डी. रक्कम रु. 1,00,000/— जप्त करुन, द्वितीय उच्चतम बोली मे. रझा मेटल्स यांची रु. 27,32,000/— अधिक जी.एस.टी. रु. 4,91,760/— असे एकूण रु. 32,23,760/— यांची बोली मंजूर करण्याची शिफारस आहे.

प्रस्ताव मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली..

**ठराव क्रमांक 287:—**
**{कारखाना विभाग}**

स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत मनपा आरोग्य विभागाचे दैनंदिन कामाकरीता 06 नग बॅक—हो—लोडर, 07 नग टिप्पर, 02 नग पोकलेन, 03 नग स्कीड स्टीअर लोडर, व 01 नग डोझर खरेदीचा आमंत्रित ई—निविदेत विभागास पुढीलप्रमाणे निन्मतम दर प्राप्त झालेले आहे.

| अ. क्र. | विवरण | निन्मतम निविदाकार | ई—निविदेत प्राप्त निन्मतम दर | खरेदीची संख्या | खरेदीची एकूण राशी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | बॅक—हो—लोडर | Action Construction Equipment Ltd. (Ace) | 19,74,140.00 (प्रति नग) | 06 | 1,18,44,840.00 |
| 2. | टिप्पर | Girnar Motors (Eicher) | 22,17,750.00 (प्रति नग) | 07 | 1,55,24,250.00 |
| 3. | पोकलेन | Sany Heavy Industries India Pvt. Ltd. | 24,73,100.00 (प्रति नग) | 02 | 49,46,200.00 |
| 4. | स्कीड स्टीअर लोडर | Action Construction Equipment Ltd. | 13,05,080.00 (प्रति नग) | 03 | 39,15,240.00 |
| 5. | डोझर | Dazco India Pvt. Ltd. (Dazco) | 83,19,000.00 (प्रति नग) | 01 | 83,19,000.00 |
| | | | एकूण | | 4,45,49,530.00 |

ई—निविदेत उपरोक्त प्राप्त निन्मतम निविदादरावर नमुद निविदाकाराकडून 06 नग बॅक—हो—लोडर, 07 नग टिप्पर, 02 नग पोकलेन, 03 नग स्कीड स्टीअर लोडर, व 01 नग डोझर खरेदी स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 288:—**
**{मंगळवारी झोन 10}**

मंगळवारी झोन क्र. 10 च्या आर्थिक वर्ष 2018—19 च्या (महसुली व्यय व भांडवलीव्यय एकूण रु. 808.00 लक्ष च्या) झोनल अंदाजपत्रकाला ठराव क्र. 03 दि. 03.09.2018 अन्वये प्रभाग समितीने मंजुरी प्रदान केलेली आहे.

सबब मंगळवारी झोन क्र. 10 च्या वर्ष 2018—19 च्या झोनल अंदाजपत्रकाला स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 289:—**
**{लोककर्म झोन 3}**

प्रभाग क्र. ६४ विठोबा लॉन ते गजाननगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण सहा निविदाकाराची निविदांपैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.९८ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३१,४६,५१६/—च्या रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 290:—**
**{लोककर्म झोन 3}**

प्रभाग क्र. ३४ सिध्देश्वरी नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण सहा निविदाकाराची निविदांपैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची प्राकलनीय दरापेक्षा ११.२० टक्के

कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. २६,०२,६१६/—च्या रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 291ः—** प्रभाग क्र. ३४ मेहरबाबा ते विठ्ठल नगर येथील रस्त्याचे
**{लोककर्म झोन 3}** डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण सहा निविदाकाराची निविदांपैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची प्राकलनीय दरापेक्षा १०.८८ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३५,३७,८८७/—च्या रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 292ः—** सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१७—२०१८ या
**{लोककर्म झोन 8}** आर्थिक वर्षाकरिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथ्थान अभियाना अंतर्गत मंजूर अनुदानातून पुर्व नागपूर क्षेत्रातील रू. २,२२,३९,८६४/— रकमेच्या ०२ कामांना मा. जिल्हाधिकारी यांचे कडून शासनाचा आर्थिक सहभाग ५०टक्के रू. १,००,००,०००/— व महानगरपालिकेचा आर्थिक सहभाग रू. १,२२,३९,८६४/— या अटीवर मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

तसेच सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१८—२०१९ या आर्थिक वर्षाकरिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथ्थान अभियाना अंतर्गत मंजूर अनुदानातून पुर्व नागपूर क्षेत्रातील रू. ३,३२,०६,३०२/— रकमेच्या ०३ कामांना मा. जिल्हाधिकारी यांचेकडून शासनाचा आर्थिक सहभाग ५० टक्के रू. १,६५,००,०००/— व महानगरपालिकेचा आर्थिक सहभाग रू. १,६७,०६,३०२/— या अटीवर मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०१८—२०१९ या आर्थिक वर्षाकरिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथ्थान अभियाना अंतर्गत महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात पद क्र. A४२००१३६०९०५ मध्ये रू. ३०० लक्ष रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे.

सन २०१७—१८ व २०१८—१९ मधील अनुक्रमे ०२ व ०३ अशा एकुण ०५ कामांकरिता म.न.पा. एकुण आर्थिक सहभाग रू. २,८९,४६,१६६ राहील सदरील खर्च व्यव पद क्र. A४२००१३६०९०५ मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 293ः—** प्रभाग क्र. ३७ ब मधील गजानन नगर परिसरातील रस्त्यांचे
**{लोककर्म झोन 1}** डांबरीकरण करण्याचे कामास्तव तयार केलेल्या रू.२६५१४०७/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. A42001374612 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 294ः—** प्रभाग क्र. ७ (ब) अंतर्गत आसीनगर येथे डॉ. सादिक यांच्या
**{लोककर्म झोन 9}** घरापासून तुली मेंशन पर्यंत सी.सी. पेव्हमेंट रोडचे बांधकाम करण्यास्तव रु. ३६,७४,८२०/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 295ः—** प्रभाग क्र. 3 अंतर्गत संघर्षनगर, गरीबनवाज नगर, शिवशक्तीनगर,
**{लोककर्म झोन 9}** निजामुद्दीन नगर, या वस्त्यामधील नाल्याच्या सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्याच्या प्राकलनीय रक्कम रु. 29,97,717/— च्या व निविदा किंमत रु. 26,73,132/— च्या कामाकरिता प्राप्त तीन निविदांपैकी, मे. आर. बी. यादव यांच्या, निविदा किंमती पेक्षा 7.88 टक्के कमी दराच्या रू. 24,62,490/— च्या निम्नतम निविदेस तथा त्यावरील 12 टक्के जी.एस.टी व 1 टक्का चाचणी शुल्क इत्यादी सह एकूण रु. 27,82,612/— च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 296</u>:— प्रभाग क्र. ७ (क) अंतर्गत बाराखोली येथील भिंत बांधण्याचे
{लोककर्म झोन 9} करण्यास्तव रु. ३१,७२,६६४/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 297</u>:— प्रभाग क्र. २१ (ड) अंतर्गत साईनगर, प्रेमनगर येथे सिमेंट
{लोककर्म झोन 7} कॉक्रीट रोडचे बांधकाम करण्यास्तव रु. ४९,१४,२५८/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 298</u>:— प्रभाग क्र. ३ (ब) अंतर्गत राजीव गांधी नगर, आएशा मस्जिद
{लोककर्म झोन 9} रोड येथे सी.सी. पेव्हमेंट रोडचे बांधकाम करण्यास्तव रु. ३९,८१,३३१/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 299</u>:— प्रभाग क्र. २ (ब) अंतर्गत रमाई नगर येथे सिमेंट रोडचे
{लोककर्म झोन 9} बांधकाम करण्यास्तव रु. ३२,१४,९०७/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 300</u>:— प्रभाग क्र. २ (अ) अंतर्गत न्यु ठवरे कॉलोनी येथे सिमेंट
{लोककर्म झोन 9} कॉक्रीटचे रस्ते तयार करण्यास्तव रु. ४९,९८,७३९/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 301</u>:— प्रभाग क्र. ५ (क) अंतर्गत मारवाडी वस्तीत रस्त्यांचे
{लोककर्म झोन 7} सिमेंटीकरण करण्यास्तव रु. ४९,९४,३४५/- रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 302</u>:— प्रभाग क्र. 38 ब अंतर्गत एकात्माता नगर मेन रोडचे डांबरीकरण
{लोककर्म झोन 1} करण्याचे कामास्तव प्राप्त 6 निविदांपैकी मे. अमृता कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा ७.११ टक्के कमी दरांची रू.४६,४२,७७०/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 303</u>:— प्रभाग क्र. 23 क अंतर्गत गरोबा मैदान येथे श्री फुलझेले ते
{लोककर्म झोन 8} ईश्वर सदन पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त निविदाकार मे. उल्हास इंटरप्रायजेस यांची प्राकलनीय दरापेक्षा 16.52 टक्के कमी दराची रु. 28,28,912/— (अठ्ठाविस हजार नऊशे बारा फक्त) राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,या कामाचा खर्च पद क्र. A 42001470511 अंतर्गत प्रस्तावीत आहे.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 304</u>:— प्रभाग क्र. २७ ब येथिल न्यु लक्ष्मीनारायन मंदीर ते म.न.पा शाळा
{लोककर्म झोन 5} कॅनल रोड ते हसनबाग रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण पाच निविदाकारांपैकी निविदांपैकी मे. एस. के मेहता ॲन्ड कंपनी यांची मुळ प्राक्कलनीय दरापेक्षा २२.८३ प्रतिशतने कमी व नविन दरापेक्षा ५.००% ने कमी दराची रू. २८,०१,२९६/— ( १२% GST + 1 % चाचणी शुल्क सह ) रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 305ः—** प्रभाग क्र. ११ अ बन्धुनगर, बाबा फरीदनगर येथे नाल्याचे
**{लोककर्म झोन 10}** भिंतीचे बांधकाम करण्याकरीता मागविण्यात आलेल्या ई निविदातील एकुण १२ प्राप्त निविदापैकी मे. दिप कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा १८.०७% कमी दराची राशी रू. ९८,३५,९८९/—(अठ्ठयानव लक्ष पस्तीस हजार नऊशे एकोन्नवद रूपये फक्त ) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 306ः—** नागपूर महानगरपालिकेत सत्र 2018—19 वर्षाकरिता माध्यमिक शाळा व
**{शिक्षण विभाग}** कनिष्ठ महाविद्यालयातील घडयाळी तासिका शिक्षकांची स्थायी समितीचा ठराव क्र. 123 दि. 05.06.2018 अन्वये 44 घडयाळी तासिका शिक्षकांना एकूण 10 महिन्याचा वार्षिक अद्यापन कालावधी गृहित धरून यांच्या वेतनावर होणार प्रति वार्षिक खर्च रू. 63,40,000/— पर्यत अपेक्षित खर्चास स्थायी समितीने उक्त ठरावानुसार मान्यता प्रदान केलेली आहे. व यास मा. आयुक्तांनी कार्यान्वित केलेले आहे.

त्याच अनुषंगाने विषय निहाय व माध्यम निहाय शिक्षकांची निकड लक्षात घेता व विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टिने 17 पदांची आवश्यकता असल्याने विभागातर्फे प्रस्ताव सादर करण्यात येतो. यात 11 माध्यमिक शिक्षकांकरिता रू. 14,000/— प्रतिमाह प्रमाणे वार्षिक खर्च रू. 15,40,000/— इतका अपेक्षित आहे. असेच कनिष्ठ महाविद्यालय 6 शिक्षकांकरिता रू. 15,000/— प्रतिमाहप्रमाणे वार्षिक खर्च 90,000/— असे एकूण रू. 24,40,000/— इतका एकूण खर्च 17 शिक्षकांना 10 महिन्याच्या वार्षिक अद्यापन कालावधीकरिता अपेक्षित आहे.

सबब वरील ठराव क्र. 123, दि. 05.06.2018 अन्वये स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार नव्याने 17 पदांकरिता रू. 24,40,000/— एवढा वार्षिक खर्चाच्या मानधनास 10 महिन्याच्या कालावधीकरिता मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 307ः—** प्रभाग क्र. १५—ब येथील सिताबर्डी येथे सोमवारी बाजार भाजीमंडी चौक ते आनंद
**{लोककर्म झोन 2}** टॉकीज चौक पर्यंत सी. सी. पेव्हमेंट रस्ता तयार करण्याच्या रु. ३३,००,९८९/— च्या कामास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 308ः—** प्रभाग क्र. १४—अ येथील गिट्टीखदान येथे श्री. सुरेश गायधने ते मनिष फॅब्रिकेशन
**{लोककर्म झोन 2}** पर्यंत सी. सी. पेव्हमेंट रस्ता तयार करण्याच्या रु. ३७,५७,५८०/— च्या कामास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 309ः—** प्रभाग क्र. १५—ड येथील धरमपेठ एक्सटेंशन परिसरात रस्त्यांचे रुंदीकरण व
**{लोककर्म झोन 2}** डांबरीकरण करण्याच्या रु. ३४,९६,१४८/— च्या कामास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 310ः—** नागपूर शहरातून निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर भांडेवाडी येथील मनपाच्या
**{ पेंच प्रकल्प कक्ष }** मलनि:सारण केन्द्राचे २०० द.ल.लि.प्रतिदिन वरुन ३०० द.ल.लि.प्रतिदिन पर्यंत क्षमता वाढविण्याबाबत.

नागपूर शहरातून दररोज अंदाजे ५०० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाण्याची निर्मिती होते. यापैकी १३० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरीता मनपा व महाजेनको दरम्यान झालेल्या ४ ऑक्टोबर २००८ रोजी च्या करारनाम्यानुसार भांडेवाडी येथे मल:निस्सारण केंद्र महाजेनकोमार्फत उभारण्यात आले व जुलै २०१६ पासून ते पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाले आहे नदीचे प्रदुषण कमी झाले तसेच यामुळे मनपाला दरवर्षी रु. १५.०० कोटी प्रमाणे महाजेनको तर्फे Royalty च्या स्वरुपात राजस्व प्राप्त होत आहे.

याबरोबर मनपाने लोकसहभाग व खाजगी भागीदारीतून (Deferred Payment) अस्तित्वात असलेल्या १०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेच्या भांडेवाडी येथे मनपाच्या प्रक्रिया केंद्राची क्षमतावाढ १०० वरुन २०० द.ल.लि. प्रतिदिन करण्याकरीता हे काम Concessionaire (SPV) यांना दि. १२.१२.२०१४ रोजी झालेल्या करारनाम्याप्रमाणे प्रदान केले होते. सद्यस्थितीत या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून मल:निस्सारण केंद्र कार्यान्वितीकरण झाले आहे. यामुळे या प्रक्रिया केंद्रामधून २०० द.ल. लि. प्रतिदिन सांडपाण्यावर प्रक्रिया होत आहे. यामधून १५० द.ल.लि. प्रतिदिन प्रक्रिया केलेले सांडपाणी (Tertiary treated)

कोराडी व खापरखेडा येथील महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत केंद्राला पुरविण्याबाबतचा त्रैपक्षीय करारनामा मनपा, महाजेनको व Concessionaire (SPV) यांच्यामध्ये दि. ३०.१२.२०१७ रोजी करण्यात आला आहे. हे पाणी विकल्या गेल्यामुळे मनपाला Concessionaire (SPV) ला दयावयाचे Deferred Payment मध्ये आर्थिक आधार मिळणार आहे.

या व्यतिरिक्त मनपाने ५ द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचे २ लघु मलनि:सारण केंद्र उभारले असून याद्वारे पिवळया नदीवर मानकापूर येथे तसेच नाग नदीवर मोक्षधाम येथे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते नदी मधे सोडण्यात येते.
या प्रकल्पांमुळे एकूण (१३०+२००+१०) ३४० द.ल.लि. सांडपाण्यावर प्रतिदिन प्रक्रिया होत असून उर्वरीत सांडपाणी प्रक्रिया न करता नाग नदीद्वारे कन्हान नदी व तद्नंतर वैनगंगा नदीला जात आहे. यामुळे गोसीखुर्द जलाशयामध्ये प्रदुषणाची वाढ झालेली आहे.

दरम्यानच्या काळात केंद्रशासनाने दि. २८ जानेवारी २०१६ ला काढलेल्या शासन निर्णयाप्रमाणे शहरालगत असलेल्या ५० कि.मी. च्या आतील औष्णिक विद्युत केंद्रांनी त्यांच्या काही उपयोगाकरीता मलनि:स्सारण प्रक्रिया केंद्रातून प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरावेत असे निर्देश काढलेले आहे.

या सर्व बाबी लक्षात घेता Concessionaire (SPV) यांनी मनपाशी अस्तित्वात असलेल्या करारनाम्याअंतर्गत त्यांच्यामार्फत सुरु असलेला २०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचे मलनि:सारण केंद्राची पुन्हा १०० द.ल.लि. प्रतिदिन प्रमाणे क्षमता बांधणी करण्याचा प्रस्ताव मनपास सादर केलेला आहे. या प्रस्तावाप्रमाणे अतिरिक्त १०० द.ल.लि. प्रतिदिन प्रमाणे क्षमता वाढविण्याकरीता लागणारा संपूर्ण Infrastructure, खर्च, व देखभाल दुरुस्ती जुन्या करारनाम्याच्या अटी व शर्तीप्रमाणे अधिकच्या १०० द.ल.लि. प्रतिदिन ला लागणाऱ्या खर्च करण्यास Concessionaire (SPV) नी मनशा दर्शविलेली आहे.
सध्या अस्तित्वात असलेल्या करारनाम्या प्रमाणे Change of Scope खालीलप्रमाणे आहे.

**14.7 Change of Scope**

**14.7.2** If the Concessionaire determines at any time that a Change of Scope is necessary for providing improved services to the Users, it shall by notice in writing require CONCESSIONING AUTHORITY to consider such Change of Scope. CONCESSIONING AUTHORITY shall, within 15 (fifteen) days of receipt of such notice, either accept such Change of Scope with modifications, if any, and initiate proceedings therefor in accordance with this Clause or inform the Concessionaires in writing of its reasons for not accepting such Change of Scope.

**14.8** Procedure for Change of Scope 14.8.1 In the event of CONCESSIONING AUTHORITY determining that a Change of Scope is necessary, it shall issue to the Concessionaire a notice specifying in reasonable detail the additional work contemplated thereunder (the "Change of Scope Notice").

**14.8.2** Upon receipt of a Change of Scope Notice, the Concessionaire shall, with due diligence, provide to the CONCESSIONING AUTHORITY such information as is necessary, together with preliminary documentation in support of:

**a.** the impact, if any, which the Change of Scope is likely to have on the Project Completion Schedule if the works or services are required to be carried out during the Development Period, and

**b.** the options for implementing the proposed Change of Scope and the effect, if any, each such option would have on the costs and time thereof, including a detailed breakdown by work classifications specifying the material and labour costs calculated in accordance with the schedule of rates applicable to the works assigned by the CONCESSIONING AUTHORITY under this contract, along with the proposed price adjustment on such rates.

**14.9.1** Notwithstanding anything to the contrary contained in this Article 14.7, 14.8 and 14.10, all costs arising out of any Change of Scope Order issued during the Development Period shall be borne by the Concessionaire, subject to an aggregate ceiling of 0.25% (zero point two five per cent) of the Project Cost. Any costs in excess of the ceiling shall be subject to Article 21& 22 of this contract In the event that the total cost arising out of Change of Scope Orders (if any) issued prior to A&DCD is less than 0.25% (zero point two five per cent) of the Project Cost, the same shall be considered to be reduction in Scope of the Project and the Clause.

सध्या अस्तित्वात असलेल्या करारनाम्या प्रमाणे त्यांचे scope of work खालीलप्रमाणे आहे.

**(a)** Construction of a New Intake Works and Raw Sewage Pumping Stations on the bank of Pioli River and Pora River, to the extent set forth under the Clause 1.1.3 of VOL–IRFP-Part-1 and Clause 1.4 of the Project Requirements ascribed to it in VOL-IIA-Part-1 of document, in accordance with this Agreement;

**(b)** Construction of Raw Sewage Transmission Pipelines from Intake Works to the existing STP to be up-graded at Bhandewadi, to the extent set forth under the Clause 1.1.3 of VOL–I-RFP-Part-1 and Clause 1.4 of the Project Requirements ascribed to it in VOL-IIA-Part-1 of document, in accordance with this Agreement;

**(c)** Augmentation of the Existing STP at Bhandewadi, to the extent set forth under the Clause 1.1.3 of VOL–I-RFP-Part-1 and Clause 1.4 of the Project Requirements ascribed to it in VOL-IIA-Part-1 of document, in accordance with this Agreement;

**(d)** To Operate and Maintain the Existing Assets of STP at Bhandewadi, in accordance to the terms of this Agreement.

**(e)** Construction of Treated Sewage Pumping Station at Bhandewadi, to the extent set forth under the Clause 1.1.3 of VOL–I-RFP-Part-1 and Clause 1.4 of the Project Requirement described to it in VOL-IIA-Part-1 of document, in accordance with this Agreement;

**(f)** Option for Right to develop Tertiary Treatment Facilities as per CPHEEO guidelines.

**2.2 Operation and Maintenance Period Activities**

(a) To Operate and Maintain the Project Facilities (including the New Intake Works, Raw Sewage Pumping Stations, Transmission Pipelines, Augmented STP and Treated Sewage Pumping Station) in accordance to the terms of this Agreement;

(b) Option for Sale of Treated Effluent OR Sale of Tertiary Treated Sewage Water for Reuse by Users of Nagpur by giving Tertiary Treatment, to the extent set forth under Clause 1.4 of the Project Requirements ascribed to it in VOL- IIA-Part-1 of document, in accordance with this Agreement;

या प्रकल्पाकरीता Concessionaire (SPV) ने पुढील प्रमाणे राशी (Deferred Payment) quote केली होती.

**Appendix I B**
**(As per tender process & financial evaluation report)**

| Year | Annual Capital Grant Rs. In Lacs. | Gross Annual Operational Support Grant (GAOSG) Rs. In Lacs | Total Grant | Present Value Factor @ 10% | Present Value |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | (4)=(2)+(3) | 5 | 6 |
| 1 | NIL | NIL | NIL | 0.9091 | - |
| 2 | NIL | NIL | NIL | 0.8264 | - |
| 3 | 720 | 3342 | 4062 | 0.7513 | 3051.78 |
| 4 | 720 | 3147 | 3867 | 0.683 | 2641.16 |
| 5 | 720 | 2970 | 3690 | 0.6209 | 2291.12 |
| 6 | 720 | 2809 | 3529 | 0.5645 | 1992.12 |
| 7 | 720 | 2911 | 3631 | 0.5132 | 1863.43 |
| 8 | 720 | 2531 | 3251 | 0.4665 | 1516.59 |
| 9 | 720 | 2645 | 3365 | 0.4241 | 1427.10 |
| 10 | 720 | 2307 | 3027 | 0.3855 | 1166.91 |
| 11 | 720 | 2212 | 2932 | 0.3505 | 1027.67 |
| 12 | 720 | 2573 | 3293 | 0.3186 | 1049.15 |
| 13 | 720 | 2059 | 2779 | 0.2897 | 805.08 |
| 14 | 720 | 2287 | 3007 | 0.2633 | 791.74 |
| 15 | 720 | 2289 | 3009 | 0.2394 | 720.35 |
| 16 | 720 | 2291 | 3011 | 0.2176 | 655.19 |
| 17 | 720 | 2175 | 2895 | 0.1978 | 572.63 |
| 18 | 720 | 2294 | 3014 | 0.1799 | 542.22 |
| 19 | 720 | 2928 | 3648 | 0.1635 | 596.45 |
| 20 | 720 | 2295 | 3015 | 0.1486 | 448.03 |
| 21 | 720 | 2296 | 3016 | 0.1351 | 407.46 |
| 22 | 720 | 2123 | 2843 | 0.1228 | 349.12 |
| 23 | 720 | 2296 | 3016 | 0.1117 | 336.89 |
| 24 | 720 | 2295 | 3015 | 0.1015 | 306.02 |
| 25 | 720 | 2295 | 3015 | 0.0923 | 278.28 |
| 26 | 720 | 2294 | 3014 | 0.0839 | 252.87 |
| 27 | 720 | 2066 | 2786 | 0.0763 | 212.57 |
| 28 | 720 | 2291 | 3011 | 0.0693 | 208.66 |
| 29 | 720 | 2290 | 3010 | 0.063 | 189.63 |
| 30 | 720 | 2288 | 3008 | 0.0573 | 172.36 |
| 31 | 720 | 2286 | 3006 | 0.0521 | 156.61 |
| 32 | 720 | 2284 | 3004 | 0.0474 | 142.39 |
| | **21600.00** | **73169.00** | **94769.00** | | **26171.66** |

Concessionaire (SPV) ने सादर केलेल्या नविन प्रस्तावातील ठळक बाबी –

- नविन १०० द.ल.लि. क्षमतेच्या प्रकल्पाकरीता लागणारी संपूर्ण गुंतवणूक, बांधकाम तसेच ३० वर्षाकरीता देखरेखीची संपूर्ण जबाबदारी Concessionaire (SPV) ची राहील.
- Concessionaire (SPV) नी सध्याच्या १०० द.ल.लि प्रकल्पाची निविदा २०१२ मध्ये भरली होती व त्याकरीता रु. २३६.०० कोटीची गुंतवणूक प्रकल्पात केली. नविन १०० द.ल.लि. च्या प्रकल्पाकरीता Concessionaire (SPV) नी २०० द.ल. लि. प्रकल्पाच्या २०१२ च्या अर्ध्या किंमतीत प्रकल्प पूर्ण करण्याची तयारी दर्शविली आहे.
- मनपाला प्रकल्प पूर्ण झाल्यावर Concessionaire (SPV) ला सध्याच्या कराराला अनुसरुन २०१२ च्या किंमतीच्या अर्ध्या किंमतीचे Annuity Payment दयावे लागेल. मात्र नविन करार हा पाण्याचा पुनर्वापराच्या करारानंतर अस्तित्वात येणार असल्याने व पुनर्वापरातून मनपाला Royalty मिळणार असल्याने मनपावर कुठलाही आर्थिक बोझा न पडता अधिकचे उत्पन्नच अपेक्षित आहे.
- ही बाब तांत्रिक तपासणी करीता केन्द्र शासनाची संस्था M/s WAPCOS Ltd. यांनी त्याचा अभिप्राय दि. २९.०९.२०१८ ला दिला आहे.

To arrive at current estimated cost for additional 100 MLD STP, NMC had requested WAPCOS (A Govt. of India undertaking) for vetting of the estimate prepared on the basis of current MJP DSR (2018-19). NMC had also requested to provide opinion on Concessionaire (SPV) 's option for augmentation of 100 MLD at Rs. 118 Crs. (50% cost for 200 MLD as estimated in 2012). Subsequently,. WAPCOS in its letter has provided the opinion as below:

*"after review of the cost estimates , the (Engineering, Procurement and Civil Cost) of the new 100 MLD STP project at Bhandewadi is proposed as **Rs. 150.67 Crs**. The vetted proposal is attached herewith for your perusal. If the existing Concessionaire has shown the willingness to execute the project for Rs. 118 Crores, it is obviously to NMC with a substantial savings in the cost and same can be considered"*

The proposal submitted by Concessionaire (SPV) is on (Differed Payment) basis and the cost estimated provided by WAPCOS is on EPC basis. Considering the expenses on Interest during Construction (IDC) and financing cost charges that would be levy on Concessionaire (SPV) to raise the fund for construction of the project willincrease a minimum of **Rs.15 Crores**. Hence considering the factors (EPC+IDC+ Finance Cost) to develop the project on PPP basis (Deferred Payment) the Total Project Cost will be Rs. 165 Crores as per current year DSR.

तसेच प्रस्तावित १०० द.ल.लि. (२०० द.ल.लि ते ३०० द.ल.लि.) प्रकल्पाकरीता खालीलप्रमाणे राशी Concessionaire (SPV) ने प्रस्तावित केली आहे जी २०१२ च्या सध्याच्या २०० द.ल.लि प्रस्तावच्या अर्धी आहे.

| Year | Annual Capital Grant Rs. In Lacs. | Gross Annual Operational Support Grant (GAOSG) Rs. In Lacs | Total Grant | Present Value Factor @ 10% | Present Value |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | (4)=(2)+(3) | 5 | 6 |
| 1 | NIL | NIL | NIL | 0.9091 | - |
| 2 | NIL | NIL | NIL | 0.8264 | - |
| 3 | NIL | NIL | NIL | 0.7513 | - |
| 4 | NIL | NIL | NIL | 0.683 | - |
| 5 | 360 | 1671 | 2031 | 0.6209 | 1261.05 |
| 6 | 360 | 1573.5 | 1933.5 | 0.5645 | 1091.46 |
| 7 | 360 | 1485 | 1845 | 0.5132 | 946.85 |
| 8 | 360 | 1404.5 | 1764.5 | 0.4665 | 823.14 |
| 9 | 360 | 1455.5 | 1815.5 | 0.4241 | 769.95 |
| 10 | 360 | 1265.5 | 1625.5 | 0.3855 | 626.63 |
| 11 | 360 | 1322.5 | 1682.5 | 0.3505 | 589.72 |
| 12 | 360 | 1153.5 | 1513.5 | 0.3186 | 482.20 |
| 13 | 360 | 1106 | 1466 | 0.2897 | 424.70 |
| 14 | 360 | 1286.5 | 1646.5 | 0.2633 | 433.52 |
| 15 | 360 | 1029.5 | 1389.5 | 0.2394 | 332.65 |
| 16 | 360 | 1143.5 | 1503.5 | 0.2176 | 327.16 |
| 17 | 360 | 1144.5 | 1504.5 | 0.1978 | 297.59 |
| 18 | 360 | 1145.5 | 1505.5 | 0.1799 | 270.84 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 19 | 360 | 1087.5 | 1447.5 | 0.1635 | 236.67 |
| 20 | 360 | 1147 | 1507 | 0.1486 | 223.94 |
| 21 | 360 | 1464 | 1824 | 0.1351 | 246.42 |
| 22 | 360 | 1147.5 | 1507.5 | 0.1228 | 185.12 |
| 23 | 360 | 1148 | 1508 | 0.1117 | 168.44 |
| 24 | 360 | 1061.5 | 1421.5 | 0.1015 | 144.28 |
| 25 | 360 | 1148 | 1508 | 0.0923 | 139.19 |
| 26 | 360 | 1147.5 | 1507.5 | 0.0839 | 126.48 |
| 27 | 360 | 1147.5 | 1507.5 | 0.0763 | 115.02 |
| 28 | 360 | 1147 | 1507 | 0.0693 | 104.44 |
| 29 | 360 | 1033 | 1393 | 0.063 | 87.76 |
| 30 | 360 | 1145.5 | 1505.5 | 0.0573 | 86.27 |
| 31 | 360 | 1145 | 1505 | 0.0521 | 78.41 |
| 32 | 360 | 1144 | 1504 | 0.0474 | 71.29 |
| | **10080** | **34299.5** | **44379.5** | | **10691.19** |

प्रस्तावित १०० द.ल.लि. प्रतिदिन चा प्रकल्प त्यांच्यामार्फत राबविल्यास खालीलप्रमाणे फायदा मनपास होवू शकेल.

| Sr. No. | Parameter | Option1 - 100 MLD as a separate project | Option 2 - 100 MLD as a augmentation proposal by Concessionaire (SPV) |
|---|---|---|---|
| 1 | Cost of Project | As per the estimated cost vetted by M/s WAPCOS LTD (GOI Undertaking) considering MJP CSR 2018-19 comes to Rs. 150 .67 Crs. Considering the project to be developed on PPP basis the Total Project Cost will be Rs. 165 Crs. | Concessionaire (SPV) has proposed to construct the additional 100 MLD on 50% of the 2012-price quoted by existing Concessionaire (SPV) for Augmentation of 100 Mld STP to 200 Mld i.e. (Rs.118 Crs). Saving to the Concessionaire (SPV) is possible because of sharing of existing infrastructure developed for 200 Mld STP. This will bring a direct benefit of Rs. 47.00 Crs. to NMC. |
| 2 | Land for Project | New 100 MLD Sewage Treatment Plant will require around 12-13 Acres of land.<br>Considering current ready reckoner rate for Bhandewadi Area (undeveloped land) the **current value of the land for 12 acres will cost Around Rs. 20 Crs.** | Concessionaire (SPV) has designed the project so as to build additional 100 MLD facility largely in the same piece of land. **No additional land will be needed.** |
| Considering point 1 & 2 above, it NMC will have a direct benefit of approx. 67.00 Crs. | | | |
| 3 | Time required to process 100 MLD STP project | Atleast 2 years because of number of Steps involved in the project<br>- Consultant appointment<br>- AMRUT or other scheme approval<br>- Tender process<br>- Award of contract | 30 Days<br><br>A month's time would be needed for internal approval of the project |
| 4 | Funding | AMRUT or internal accrual<br>- Project through internal accrual will be difficult looking at the current financial situation<br>- Event in case of AMRUT, 50% funds have to be invested by NMC | 100% by private Concessionaire (SPV) which shall be refunded on annuity basis in the concession period. If total water is sold, then the project will be free for NMC. |

Looking to the benefits enlisted above, it will be beneficial for NMC to accept option 2 above.

उपरोक्त प्रस्ताव मुख्य अभियंता यांच्यामार्फत मा. आयुक्त यांचेकडे सादर करण्यात आला. मुख्य अभियंता यांनी सूचविल्याप्रमाणे प्रस्ताव अस्तित्वात असलेल्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देता येवू शकेल काय हे ठरविण्याकरीता मनपाचे विधी सल्लागार यांच्याकडून सल्ला घेवून सादर करावे असे निर्देश दिले. याप्रमाणे Concessionaire (SPV) नी दिलेला प्रस्ताव व संपूर्ण नस्ती विधी सल्लागाराकडे पाठविण्यात आली. यावर विधी सल्लागारामार्फत दि. २४.०२.२०१८ च्या दिलेल्या सल्ल्यामध्ये काही बाबींचा खुलासा करण्याकरीता Concessionaire (SPV) ला कळवावे असे सूचविले. त्यावर दि. २३.०३. २०१८ च्या पत्रान्वये Concessionaire (SPV) नी घेतलेल्या मुद्यांचा खुलासा केलेला आहे व तो विधी सल्लागाराकडे सादर करण्यात आला.

संपूर्ण बाबींची तपासणी करुन विधी सल्लागाराने दि. २८.०३.२०१८ ला आपले अभिमत सादर केले असून त्यामध्ये त्यांनी पुढीलप्रमाणे उल्लेख केलेला आहे.

*"In my opinion if the existing Concessionaire (SPV) / NMC gets any prospective buyer in near future then it would be advisable to go in for the augmentation of STP from 200 to 300 MLD. Further, the NMC may ask Concessionaire (SPV) to enhance the royalty payable to NMC is liable to get additional financial benefit. Hence may go ahead with the augmentation work subject to the above condition and prior approval of the standing committee and subsequently the approval of General Body of NMC.*

*If this proposal of the Concessionaire (SPV) is accepted by NMC then it would help it in reducing the pollution load in Nag river as well Wainganga river for which NMC has been facing legal battle before the National Green Tribunal, Pune as well the Nagpur Bench of the Bombay High Court."*

या प्रस्तावाअंतर्गत Concessionaire (SPV) नी २०० द.ल.लि. ची क्षमता १०० द.ल.लि. ने वाढविणे अपेक्षित आहे. सध्याच्या करारातील अटी व शर्ती नविन प्रकल्पाला as it is लागू करुन Concessionaire (SPV) नी नविन प्रकल्पाची संपूर्ण गुंतवणूक बांधकाम संपूर्ण प्रकल्प काळातील देखभाल व दुरुस्ती करणे तसेच सांडपाण्याच्या शुध्दीकरणानंतर Rights of reuse Concessionaire (SPV) ला देणे प्रस्तावित आहे.

हा एकूण रु. ४४३.७९ कोटीचा {Rs. 100.80 Crs. (annual capital grant) + Rs. 342.99 Crs. Grass annual operational support grant)} प्रस्ताव मंजूर झाल्यावर, NTPC किंवा इतर ग्राहकाद्वारे या प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची मागणी आल्यावरच या कामाचे कार्यादेश देण्यात येतील जेणे करुन मनपावर आर्थिक बोझा बसणार नाही. तसेच रॉयल्टीत वाढ करण्याबाबत NTPC शी होणाऱ्या करारानंतर निर्णय घ्यावा लागेल. या कामाची निविदा मागविण्यात येणार नाही. या कामाबाबत सन २०१९–२० च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येईल. तसेच या प्रस्तावाशी निगडीत सर्व बाबी विचारात घेवून सध्याच्या करारनाम्यात आवश्यक ते बदल करुन या संदर्भातील पुरवणी करार Concessionaire (SPV) सोबत कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे.

ही संपूर्ण बाब मा. आयुक्तांकडे सादर करण्यात आली व त्यांनी दि. २४.०४.२०१८ च्या आदेशान्वये मा. स्थायी समितीच्या व मनपाच्या महासभेत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिलेत.

मा. स्थायी समितीद्वारे वरील विषयावर यथायोग्य निर्णय घेण्याच्या विचारार्थ सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयास एकमताने मंजुरी प्रदान करते व अंतिम मंजुरीकरिता विषय मनपा सभागृहाकडे पाठविण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 311</u>:— {बाजार विभाग}

स्थायी समिती ठराव क्र. 288 दि. 14/07/2016 अन्वये म.न.पा. मालकीच्या इमारत/ बाजारातील दुकान/ओटे/खुल्या जागा करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) प्रमाणे वापर शुल्क चालु बाजार किंमती प्रमाणे (नगर रचना दरानुसार) दि. 1/04/2018 लागु करण्यात आलेले आहे. सदर वापर शुल्क मा. सभागृह यांनी आदेशीत केल्याप्रमाणे एक सदस्यीय समितीच्या शिफारसी नुसार सर्व म.न.पा. बाजार पेठेतील दुकाने/ओटे/जागा यांना वापर शुल्क आकारून कार्यवाही करण्यात आलेली आहे. बाजार विभागाव्दारे नगर रचना दरानुसार सर्व दुकान/ओटे/जागा यांना सुधारीत मागणीपत्र सुध्दा देण्यात आलेले आहेत. सदर मागणीपत्रा प्रमाणे वापर शुल्कामध्ये भरमसाठ वाढ झालेली आहे, असे दिसुन येते. या वापर शुल्कात प्रचंड वाढ झाल्यामुळे अनेक परवानेधारक यांनी याबाबत आक्षेप घेतले आहेत. विभागास अनेक तक्रारी मौखीक व लेखी सादर केल्या व काही परवानेधारक यांनी न्यायालयात सुध्दा प्रकरण दाखल केलेले आहेत. या अनुषंगाने मा. सभापती, विधी समिती यांनी दि. 13/08/2018 रोजी बैठक आयोजीत केली व बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे विचार ऐकुन घेतले तद्नंतर नगर रचना दरानुसार येणाऱ्या दरामध्ये 50 % वापर शुल्क कलम 332 (अ) मध्ये असलेल्या तरतुदीप्रमाणे स्थायी समितीला प्रस्ताव सादर करावा, असे आदेशीत केले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 332 (अ) मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

नगरपालिका बाजारातील, कत्तलखान्यातील किंवा पशु–आवारातील कोणताही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा, छपरी किंवा कोंडवाडा किंवा अन्य इमारत यांचा भोगवटा किंवा वापर करण्याबद्दल आणि नगरपालिका बाजारात विक्रीसाठी माल मांडणाऱ्या अधिकाराबद्दल आणि अशा कोणत्याही बाजारात विकलेल्या मालाचे वजन करण्याबद्दल व तो मोजण्याबद्दल आणि कोंणत्याही नगरपालिका कत्तलखान्यात जनावरांची कत्तल करण्याच्या अधिकाराबद्दल याबाबत स्थायी समितीच्या मान्यतेने, तो वेळोवेळी ठरवील असे दुकान भाडे, भाडे आणि फी आकारता येईल. त्याकरीता स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक वाटते.

या अनुषंगाने खालील बाबी प्रस्तावित करण्यात येत आहेत.

अ) विधी समिती यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे नगर रचना दरानुसार येणाऱ्या दरामध्ये म.न.पा. बाजारातील दुकान/ओटे/जागेच्या वापर शुल्कामध्ये 50 % शुल्क कपात करणे.

ब) नगर रचना दरामध्ये दरवर्षी होणाऱ्या बदलाच्या अनुषंगाने वापर शुल्क आकारून त्यामध्ये 50 % कपात करणे व सदर दर दरवर्षी 1 एप्रिल पासुन लागु करणे.

सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीकडे पाठविण्याबाबत मा. आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे या अनुषंगाने उपरोक्त सादर केलेल्या 'अ' व 'ब' प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 332 (अ) अन्वये असलेल्या अधिकारांतर्गत मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

अ) विधी समिती यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे नगर रचना दरानुसार येणाऱ्या दरामध्ये म.न.पा. बाजारातील दुकान/ओटे/जागेच्या वापर शुल्कामध्ये 50 % शुल्क कपात करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन एकमताने मंजुरी प्रदान केली.

ब) नगर रचना दरामध्ये दरवर्षी होणाऱ्या बदलाच्या अनुषंगाने वापर शुल्क आकारून त्यामध्ये 50 % कपात करणे व सदर दर दरवर्षी 1 एप्रिल पासुन लागु करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मागील वर्षाच्या सिद्ध शिघ्र गणकानुसार आकारण्यात आलेल्या 50 टक्के रकमेत 10 टक्के वाढ करुन येणारे दर किंवा त्या चालू आर्थिक वर्षाच्या सिद्ध शिघ्र गणकानुसार आकारण्यात आलेल्या दराच्या 50 टक्के दर यापैकी जे कमाल दर असतील ते दर चालू आर्थिक वर्षात ग्राहय धरावे या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 312</u>:– {कर व कर आकारणी} दि. 01.10.2018 ला झालेल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये अध्यक्ष, स्थायी समिती यांनी दिलेल्या कर व कर आकारणी विभागाला दिलेल्या निर्देशाप्रमाणे माहितीचा आढावा व चर्चा.

उपरोक्त विषयाचा स्थायी समितीने आढावा घेऊन कर वसुली दिलेल्या मागणीनुसार विभागाने करावे असे निर्देश दिले. तसेच वारंट व जप्तीच्या कार्यवाही त्वरित सुरु कराव्या असेही निर्देश दिले. याबाबतच्या प्रगतीचा अहवाल स्थायी समितीच्या पटलावर ठेवावा यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 313</u> :–

–: ठराव :–

ज्याअर्थी नागपूर महानगरपालिका क्षेत्रात दोन प्राधिकारणीकडे इमारत मंजूरीचे अधिकार आहे. त्याअर्थी नागपूर सुधार प्रन्यास यांनी रु. 1 कोटी पेक्षा जास्त भुगतानाचे देयक निघत असलेल्या भुखंडधारकांना टप्या टप्याने देयके भरण्याची सुविधा ठरावा द्वारे देण्यात आली आहे. म्हणून महानगरपालिकेच्या इमारत नियंत्रण क्षेत्रात सुध्दा अशी पध्दत अंमलात आणायला पाहिजे असे आमचे मत आहे. एकंदरीत इमारत बांधकाम रेखाचित्र मंजूर करतांना आकारण्यात येणारे शुल्क अनेक जमीन मालक व विकासकांना एकमुस्त भरणे शक्य होत नाही. आर्थिक मंदी मुळे बांधकाम क्षेत्रामध्ये जी प्रगती व्हावयास पाहिजे ती होत नसुन त्यामुळे या व्यवसायावर मंदी निर्माण झालेले आहे. याचा परिणाम महानगरपालिकेच्या

आर्थिक स्त्रोतावर झालेला आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे व नागपूर क्षेत्रातील जमीन मालक व विकासक यांना सुध्दा शुल्क भरतांना सोईचे व्हावे या दृष्टीकोनातून टप्पा टप्पाने शुल्क भरावयाचा नागपूर सुधार प्रन्यासने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे महानगरपालिकेने सुध्दा असा निर्णय घ्यावा असे आमचे मत आहे.

करिता महानगरपालिकेच्या क्षेत्रात जमीन विकास व्यवसाय सुलभतेच्या दृष्टीकोनातून सर्व समावेशक निर्णय या स्थायी समितीने घेवून रु. 1 कोटी पेक्षा अधिक शुल्क येणारे जमीन मालक व विकासकांना टप्पा टप्पाने शुल्क घेवून बांधकाम परवानगी देण्यास या धोरणास स्थायी समितीने मंजूरी प्रदान करुन उपरोक्त बाब धोरणात्मक निर्णयाकरिता महानगरपालिकेच्या सभागृहाकडे मंजूरी करिता पाठवावी ही विनंती. तसेच आणखी असे की, उपरोक्त धोरणात्मक निर्णय म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्यापूर्वी विभागाने ना.सु.प्र. ने मंजूर केलेल्या ठरावाचा अभ्यास करुन व विभागाच्या सुचना अंतर्भुत करुन पाठवाव्या त्याच प्रमाणे ''प्रशमिता संरचना'' अंतर्गत नोंदणी शुल्कबाबचा सुध्दा निर्णय पुनर्विचाराकरिता सोबत पाठवावा यास सुध्दा या स्थायी समितीने मंजूरी प्रदान करावी ही विनंती.

सुचक – हस्ता/– श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार
(स्था. समिती सदस्य)
अनुमोदक – हस्ता/– श्री. महेश केशवराव महाजन
(स्था. समिती सदस्य)
हस्ता/– श्री. शेषराव शंकरराव गोतमारे
(स्था. समिती सदस्य)

मा. सदस्यांनी सादर केलेला वरील ठराव मा. सभापती, स्थायी समिती यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये वाचून दाखविला व त्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली. तसेच मनपा सभागृहाकडे मंजुरीसाठी पाठविण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

सभापती :– टॅक्स के संदर्भ मे संबंधित अधिकारी जानकारी दे।

सहा.आयुक्त (श्री.मेश्राम) :– मा.सभापती महोदय, आर्थिक वर्ष 2018 – 2019 मध्ये स्थायी समितीने 509 कोटी रुपयांचे उद्दीष्ट दिले होते त्यानुसार क्वॉर्टरली आपण झोनचे उद्दीष्ट निश्चित केले होते त्या अनुषंगाने 35 टक्के उद्दीष्ट गाठले आहे. मागच्या वर्षी 30 सप्टेबर पर्यतचे कट ऑफ डेट मध्ये 73.33 कोटी वसुल झाले होते व या वर्षी 84.46 कोटी रुपये वसुल झाले आहे. मागच्या वर्षी 10 ऑगस्ट पर्यत ॲमिनिस्टी स्कीम असतांना त्या कालावधीमये अरिअर्सची रक्कम 45 कोटी रुपये मागच्या वर्षी वसुली झाली होती परंतु या वषी कुठलीही स्कीम नसतांना 84.46 कोटी रुपये 30 सप्टेंबर पर्यत वसुल केले आहे जे उद्दीष्ट 30 सप्टेबर पर्यत दिले होते त्या तुलनेने आपण मागे आहे. त्या अनुषंगाने झोन निहाय खालील प्रमाणे सविस्तर माहिती सादर करतो.

झोन क्र 1 लक्ष्मीनगर :– मा.सभापती महोदय, लक्ष्मीनगर झोन अंतर्गत या वर्षी 13.69 कोटी रुपये वसुल झाले आहे गव्हर्नमेंट प्रॉपर्टीची वसुलीचा त्या वसुलीमध्ये समावेश केला आहे. मागच्या वर्षी 10.13 कोटी रुपये वसुल करण्यात आले होते. या वर्षी 3.56 कोटी रुपयांची वसुलीमध्ये वाढ झालेली आहे. 31 मार्च पर्यत लक्ष्मीनगर झोनला 115.16 कोटी रुपये वसुल करावयाचे आहे. लक्ष्मीनगर झोनची एकुण डिमांड 48086 आहे. त्यापैकी 35449 डिमांडचे वाटप झाले आहे 12637 डिमांड प्रलंबित आहे.

सभापती :– आर्थिक वर्ष 2018– 2019 की डिमांड सभी झोन मे दि गयी है क्या?

श्री.मनोज सांगोळे :– मा.सभापती महोदय, जेवढया फाईल प्रलंबित आहे त्याला प्रशासकीय मंजूरी का देत नाही. त्याच्या संदर्भात माहिती देण्यात यावी. वसुली रेगुलर सुरु आहे ती तर येणारच आहे. दवाखान्याची एक नस्ती टेक्नीकल सॉग्शनसाठी तालेवार साहेबाकडे पडुन आहे. नगररचना विभागाकडे नकाशा मंजूरीसाठी पडुन आहे ती फाईल प्रलंबित का ठेवण्यात आली आहे याच्यावर विचार करावा लागेल.

झोन क्र 2 धरमपेठ :– मा.सभापती महोदय, एकुण 22,124 डिमांड देण्यात आल्या होत्या त्यापैकी 20,009 डिमांडचे वाटप करण्यात आले आहे. 54.89 कोटी रुपये 30 सप्टेंबर पर्यत वसुल करावयाचे होते त्यापैकी 14.05 करोड रुपयांची वसुली झाली आहे.

झोन क्र 3 हनुमाननगर :— मा.सभापती महोदय, हनुमान नगर झोन अंतर्गत एकुण 34,617 डिमांड आहे त्यापैकी 26474 डिमांडचे वाटप झाले आहे. 7500 डिमांडचे वाटप व्हायचे आहे. 30 सप्टेबर पर्यत 46. 20 कोटी रुपयांचे उद्यीष्ट देण्यात आले होते त्यापैकी 21.84 करोड रुपयांची वसुली झालेली आहे. मागच्या वर्षी 7.79 करोड रुपयांची वसुली झाली होती.

झोन क्र 4 धंतोली :— मा.सभापती महोदय, धंतोली झोन अंतर्गत एकुण डिमांड 18239 आहे त्यापैकी 14864 डिमांडचे वाटप करण्यात आले आहे. या वर्षीचे उद्यीष्ट 36.72 कोटी आहे त्यापैकी 30 सप्टेंबर पर्यत 17.33 कोटी रुपये वसुल करावयाचे होते त्यापैकी 7.27 करोड रुपये वसुल झाले आहे. मागच्या वर्षी 4.77 कोटी रुपये वसुल झाले होते या वर्षी अडीच करोड रुपयांची वाढ झालेली आहे.

सभापती :— टॅक्स विभाग के अंतर्गत नागरिकों को टॅक्स की डिमांड नही मिल रही है, निगम आयुक्त ने इस संदर्भ मे चौकशी करनी चाहियें। विभाग व्दारा कितनी डिमांड जनरेट की गयी है, कितनी डिमांड बांटी गयी है, डिमांड मे जो तफावत आ रही है उसे चेक करना चाहिये। जो असेसमेंट किया जा रहा है उसकी चेकिंग करनी चाहियें। इस साल टॅक्स की वसुली पिछले साल के मुकाबिल डबल होनी चाहियें।

झोन क्र 5 नेहरुनगर :— मा.सभापती महोदय, नेहरुनगर झोन अंतर्गत एकुण डिमांड 43,518 करोड आहे त्यापैकी 38058 डिमांडचे वाटप झाले आहे या वर्षाचे उद्यीष्ट 32.52 कोटी रुपये आहे त्यापैकी 30 सप्टेबर पर्यत 15.39 कोटी रुपये वसुल करावयाचे होते त्यापैकी 6.24 करोड रुपयांची वसुली झालेली आहे. मागच्या वर्षी 5.74 कोटी रुपयांची वसुली झाली होती. या वर्षी 50 लक्ष रुपयांची वाढ झालेली आहे.

झोन क्र 6 गांधीबाग :— मा.सभापती महोदय, गांधीबाग झोन अंतर्गत एकुण डिमांड 13376 आहे त्यापैकी 12475 डिमांडचे वाटप झाले आहे या वर्षाचे एकुण उद्यीष्टे 17 करोड आहे. 30 सप्टेबर पर्यत 8.09 करोड रुपयांचे वसुली करावयाची होती त्यापैकी 3.40 करोड रुपयांची वसुली झाली आहे. मागच्या वर्षी 3. 55 करोड रुपयांची वसुली झाली होती. मागच्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी 15 लक्ष रुपयांनी मागे आहे.

सभापती :— 31 मार्च तक 17 कोटी रुपये का प्रोव्हीजन है मगर 3.40 कोटी रुपये ही वसुली की गयी है यह बहोत बडा डिफरन्स है। आपकों 30 ऑक्टोबर तक जो फिगर दिया गया है वह पिछले साल के मुकाबिल डबल करना है। जो डिमांड दि जा रही है उसे चेक करके आगे भेजीयें। गांधीबाग झोन के आकडों मे बहोत बडा डिफरन्स है। सभा के बाद मे आप मेश्राम साहब के साथ बैठकर वह डिफरन्स चेक कर लिजीयें। गांधीबाग झोन की वसुली बहोत कम है उस ओर ध्यान दिया जायें। विभाग को जो टारगेट दिया गया है वह पुरा किया जायें।

झोन क्र 7 सतरंजीपुरा :— मा.सभापती महोदय, सतरंजीपुरा झोन अंतर्गत एकुण डिमांड 18952 आहे त्यापैकी 17692 डिमांडचे वाटप झाले आहे. या वर्षीचे उद्यीष्ट 30.41 होते 30 सप्टेबर पर्यत 11.12 करोड रुपयांची वसुली करावयाची होती त्यातुन 2.6 करोड रुपयांची वसुली झाली आहे.

सहा.आयुक्त (श्री.वराडे) :— मा.सभापती महोदय, 1.50 करोड रुपये मागच्या वर्षी मेओ चे टॅक्सचे पैसे प्राप्त झाले होते.

सभापती :— मेओ हॉस्पीटल की ओर से इस साल देड कोटी रुपये वसुल किये जायें इस संदर्भ मे उनसे पत्रव्यवहार किया जायें। आपके झोन का टारगेट जो दिया गया है उस हिसाब से वसुली काफी कम है उस ओर ध्यान दिया जायें।

झोन क्र 8 लकडगंज :— मा.सभापती महोदय, लकडगंज झोन अंतर्गत एकुण डिमांड 53,431 देण्यात आल्या होत्या त्यापैकी 44,872 डिमांड वाटण्यात आल्या आहे. 30 सप्टेंबर पर्यत 37 कोटी रुपये वसुल करावयाचे होते त्यापैकी 11.31 कोटी रुपये वसुल करण्यात आले आहे. मागच्या वर्षी या वेळी 8.02 कोटी रुपये वसुल करण्यात आले होते. त्या तुलनेत यावर्षी 2 कोटी 91 लक्ष रुपयांनी समोर आहे.

सभापती :— झोन को जो टारगेट दिये गयें है उसे पुरा करने के लिये काफी मेहनत करनी पडेगी। 30 ऑक्टोबर तक जो टारगेट विभाग को दिया गया है वह पिछले ऑक्टोबर के मुकाबिल डबल होना चाहियें। विभाग के कार्यो के उपर निगम आयुक्त ध्यान दे।

झोन क्र 9 आशीनगर :— मा.सभापती महोदय, आशीनगर झोन अंतर्गत एकुण डिमांड 40,731 देण्यात आल्या होत्या त्यापैकी 36835 डिमांड वाटण्यात आल्या आहेत. एकुण टारगेट 42.98 कोटी रुपये आहे. 30 सप्टेंबर पर्यत 20.14 कोटी रुपये वसुल करावयाचे होते त्यापैकी 6.13 कोटी रुपये वसुल झाले आहे. मागच्या वर्षी 5.6 करोड रुपयांची वसुली झाली होती.

सभापती :— झोन अंतर्गत जो डिमांड जनरेट हो रही है उसपर विशेष ध्यान देना चाहियें। पुरी डिमांड बाटी जा रही है या नही उसपर मॉनेटरींग होना चाहिये। क्यौकी लोगों की शिकायत आ रही है की उन्हे डिमांड नही मिल रही है। इसे रिचेक करना चाहियें। आयुक्त महोदय इस ओर ध्यान दे।

झोन क्र 10 मंगळवारी :— मा.सभापती महोदय, मंगळवारी झोन अंतर्गत एकुण डिमांड 27,530 देण्यात आल्या होत्या त्यापैकी 25078 डिमांड वाटण्यात आल्या आहेत. झोन अंतर्गत टॅक्स वसुलीचे टारगेट 61 कोटी रुपये होते. 30 सप्टेंबर पर्यत 28.90 कोटी रुपये वसुल करावयाचे होते आतापर्यत 11 कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. मागच्या वर्षी या काळात 8.90कोटी रुपये वसुल करण्यात आले होते. 2 कोटी रुपयांनी या वर्षी समोर आहे.

सभापती :— ऐरिअर्स के टॅक्स की वसुली के संदर्भ मे प्रॉप्रर्टी ॲटचमेंट की कारवाई नही की जा रही है। विभाग व्दारा ऑक्शन की कारवाई नही की जा रही है। इस संदर्भ मे निगम आयुक्त ने कारवाई करनी चाहियें। गुंठेवारी क्षेत्र मे बहोत सारे लेआउट महानगरपालिका को हॅन्डओव्हर किये गये है लेकीन वहापर असेसमेंट की कारवाई नही की जा रही है। उस क्षेत्र मे असेसमेंट की कारवाई तुरंत की जानी चाहिंयें। गुंठेवारी क्षेत्र मे डेव्हलपमेंट की जरुरत बहोत जादा है मगर देखने मे आ रहा है की उस क्षेत्र मे डेव्हलपमेंट के काम बडे पैमाने मे नही हो रहे है इस और ध्यान देना बहोत जरुरी है। मा.सदस्य के फाईल के संदर्भ मे तंरुत कारवाई होनी चाहियें। मा.सदस्य मेहनत करके अपने प्रभाग के विकास कामों की फाईल बनाते है, उन फाईलों पे तुरंत निर्णय लेना चाहियें। नगररचना विभाग के अंतर्गत बी.पी.एम.एस. के संदर्भ मे काफी पैमाने मे शिकायते प्राप्त हो रही है। टाउन प्लॅनिंग विभाग मे बडे पैमाने में कामों को सांग्शन नही मिल रहा है जिसके कारण रेव्हेन्यु रुकी हुयी है। एक प्लॅन सॅग्शन करने के लिये 2 महिने का समय लग रहा है। इन कामों को गती देनी चाहिये। ताकी महानगरपालिके का रेव्हेन्यु बढसके। अकाउंट विभाग के अंतर्गत लोन के संदर्भ मे जानकारी दि जायें।

श्री.नितीन कापडणीस (उपायुक्त) :— मा.सभापती महोदय, या संदर्भात बॅक ऑफ महाराष्ट्र यांच्या अधिका—यांशी पत्रव्यवहार करण्यात आले आहे. पुणे शाखेच्या उच्च अधिका—यांशी संपर्क साधुन लवकरच लोन मिळण्याची प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल.

सभापती :— यह काम जल्द से जल्द पुरा किया जायें।

श्री.सुनिल हिरणवार :— मा.सभापती महोदय, मा.सदस्यों की वार्ड विकासों की फाईल काफी पैमाने पर अधिकारीयों के पास प्रलंबित है उसपर तंरुत निर्णय लेना चाहियें। जिस फाईल के संदर्भ मे उन्हे डाउट है उसकी चौकशी करनी चाहियें। जिन फाईलों को टेक्नीकल सॅग्शन मिला है उन्हे तूंरत मंजूर किया जाना चाहियें।

<u>ठराव क्रमांक 314</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर